ePaper

## "होर्मुझ आता अमेरिकेचा भूभाग", ट्रम्प यांनी शेअर केला खळबळजनक नकाशा




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज(TM)

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 19 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...
मोशीत उभारणार आदिवासी विकासाचे 'महाकेंद्र'!

## कपिल सिब्बलांचा सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद..!

# शिंदेंसोबत गेलेले आमदार अपात्र?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्हावरून सुरू असलेल्या वादाच्या सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाचा युक्तिवाद केला. एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेलेल्या आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय आधी होणे आवश्यक होते. त्यानंतरच शिवसेना पक्ष नेमका कोणाचा आणि पक्षाचे चिन्ह कोणाला मिळावे, याबाबत निर्णय घेणे योग्य ठरले असते, असा दावा सिब्बल यांनी केला.**




### निवडणूक आयोगाच्या निर्णयावरही प्रश्न

शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयालाही ठाकरे गटाने आव्हान दिले आहे. सिब्बल यांच्या म्हणण्यानुसार, आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय होण्यापूर्वीच 'खरा पक्ष कोणता' हा प्रश्न सोडवणे योग्य नव्हते. जर अपात्रतेच्या याचिकेतील आमदार नंतर अपात्र ठरले, तर पक्षातील त्यांचे संख्याबळ विचारात घेतले जाऊ शकत नाही. त्यामुळे आधी अपात्रतेचा निर्णय आणि त्यानंतर पक्षाची ओळख निश्चित करण्याची प्रक्रिया व्हायला हवी होती, असा मुद्दा त्यांनी मांडला.

शिवसेनेत २०२२ मध्ये फूट पडल्यानंतर शिंदे गटातील आमदारांविरोधात अपात्रतेच्या याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांवर निर्णय होण्यापूर्वीच पक्षाची ओळख आणि निवडणूक चिन्हाबाबत प्रक्रिया पुढे गेली. त्यामुळे ज्या आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न प्रलंबित होता, त्यांचे संख्याबळ पक्षाची ओळख निश्चित करण्यासाठी कसे वापरता येईल, असा सवाल सिब्बल यांनी उपस्थित केला.

संविधानातील दहाव्या अनुसूचीचा आधार घेत सिब्बल यांनी पक्षांतरबंदी कायद्याचाही उल्लेख केला. पक्षाच्या भूमिकेविरोधात जाऊन काम करणाऱ्या किंवा पक्षाचा व्हिप मोडणाऱ्या आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आधी अपात्रतेचा निर्णय आणि त्यानंतर पक्षाची ओळख निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विधानसभेतील आमदारांचे बहुमत असले म्हणून तो गट आपोआप मूळ राजकीय पक्ष ठरत नाही, असाही सिब्बल यांचा युक्तिवाद होता. विधिमंडळ पक्ष आणि मूळ राजकीय पक्ष या दोन वेगळ्या संकल्पना आहेत. पक्षाची संघटनात्मक रचना, पक्षघटना आणि नेतृत्व यांचाही विचार करणे आवश्यक आहे, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन्ही गटांतील आमदारांना अपात्र ठरवले नव्हते. त्यानंतर शिंदे गटाला मूळ शिवसेना म्हणून मान्यता मिळाली. या प्रक्रियेवरही ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. तसेच निवडणूक आयोगाने शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला दिल्याच्या निर्णयालाही सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यान २०१८ च्या शिवसेना पक्षघटनेचा मुद्दाही उपस्थित झाला. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला आणि पक्षाच्या संघटनात्मक रचनेला योग्य महत्त्व देण्यात आले नसल्याचा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला.

या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय महाराष्ट्राच्या राजकारणासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. मात्र, सिब्बल यांनी मांडलेले मुद्दे हे ठाकरे गटाची बाजू असून, न्यायालयाचा अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे.

### राहुल नार्वेकरांच्या निर्णयावर आक्षेप

या प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन्ही गटांच्या आमदारांना अपात्र ठरवले नव्हते. त्यानंतर शिंदे गटाला मूळ शिवसेना पक्ष म्हणून मान्यता देण्यात आली. यावर सिब्बल यांनी आक्षेप घेतला. अपात्रतेचा प्रश्न निकाली न काढता राजकीय पक्षाची ओळख ठरवणे चुकीचे असल्याचा त्यांचा दावा होता. शिंदे गटातील आमदार अपात्र ठरले असते, तर पुढील अनेक घडामोडी वेगळ्या पद्धतीने घडल्या असत्या, असेही त्यांनी न्यायालयात सांगितले.

### २०१८ च्या पक्षघटनेचाही मुद्दा

सुनावणीदरम्यान शिवसेनेच्या पक्षघटनेचा मुद्दाही चर्चेत आला. सिब्बल यांनी २०१८ मधील पक्षरचना आणि पक्षाच्या नेतृत्वाचा आधार घेऊन युक्तिवाद केला. विधानसभा अध्यक्षांनी जुन्या पक्षघटनेचा संदर्भ घेतल्याबद्दलही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. उद्धव ठाकरे हे पक्षप्रमुख असल्याचे मान्य असतानाही त्यांच्या नेतृत्वाला पुरेसे महत्त्व दिले गेले नाही, असा दावा ठाकरे गटाच्या वकिलांनी केला.

### नेमका वाद काय आहे?

२०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत मोठी फूट पडली. त्यानंतर ठाकरे आणि शिंदे असे दोन गट तयार झाले. दोन्ही गटांनी आपणच खरी शिवसेना असल्याचा दावा केला. यानंतर विधानसभा अध्यक्षांनी शिंदे गटाला शिवसेनेचे प्रतिनिधित्व करणारा गट मानले. निवडणूक आयोगानेही शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला दिले. या दोन्ही निर्णयांविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

**टीप: न्यायालयात कपिल सिब्बल यांनी मांडलेले मुद्दे हे ठाकरे गटाची बाजू आहे. या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे.**

# पुण्यात ६० हजार कोटींचे रस्ते

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

**महाईन्यूज । पुणे**

**‘पुण्यात वाहतूककोंडी आणि प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे कोणाचीही येथे येण्याची इच्छा होत नाही,’ अशी खंत केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. ‘या समस्येतून मार्ग काढण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुण्यात ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत,’ असे त्यांनी जाहीर केले.**



### प्रमुख प्रकल्प

- पुणे-शिरूर उन्नत मार्ग : ७,५१५ कोटी रुपये (५३.४० किमी)
- हडपसर ते यवत उन्नत मार्ग : ५,२६५ कोटी रुपये (३१.६५ किमी)
- तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्ग : ४,००० कोटी रुपये (५४.२० किमी); मार्गाचे भूमिपूजन झाले असून, काम सुरू.
- शिरूर ते छत्रपती संभाजीनगर : १५,००० कोटी रुपये (१९२ किमी)
- खेड ते नाशिक फाटा एलिव्हेटेड मार्ग : ८,००० कोटी रुपये (३० किमी); मार्गाची निविदा प्रक्रिया पूर्ण.
- रावेत ते नऱ्हे उन्नत कॉरिडॉर : ६,००० कोटी रुपये (३२ किमी)

सिम्बायोसिस अभिमत विद्यापीठाच्या वतीने आयोजित ‘फेस्टिव्हल ऑफ थिंकर्स’ या कार्यक्रमात गडकरी बोलत होते. विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रोव्होस्ट डॉ. राजीव येरवडेकर, कुलसचिव डॉ. शेजूळ आदी या वेळी उपस्थित होते. ‘पुण्यातील प्रकल्पांसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त सहकार्यातून विशेष ‘इनोव्हेटिव्ह फायनान्सिंग मॉडेल’ तयार करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पांचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होईल,’ असे गडकरी यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले, ‘पुण्यात बाहेरून येणाऱ्या आणि परराज्यांत जाणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड आहे. शहरावरील हा ताण कमी करण्यासाठी बाह्यवळण मार्ग उभारले जात आहेत. सूरत-नाशिक-अहिल्यानगर- सोलापूर-दक्षिण भारत कॉरिडॉरमुळे उत्तर भारत, गुजरातहून दक्षिण भारतात जाणाऱ्या वाहनांना मुंबई वा पुण्यात प्रवेश करण्याची गरज भासणार नाही. ही वाहतूक सूरतवरून थेट नाशिक, अहिल्यानगर, सोलापूरमार्गे दक्षिण भारतात वळवली जाईल. त्यामुळे दिल्ली ते चेन्नई हे अंतर ३२० किलोमीटरने कमी होईल.

त्याशिवाय पुण्यातील जड वाहतूकही बाहेरून वळवली जाईल. ठाणे आणि शिळफाटा भागातून येणारी वाहतूकही पुण्यात न येता थेट अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगरकडे वळवण्यासाठी नव्या ‘लिंक रोड’चे नियोजन आहे.’‘नवीन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचेही काम करण्यात येत आहे. नुकतीच पागोटे चौकापर्यंतच्या कामांसाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या नव्या मार्गामुळे मुंबई ते बंगळुरू प्रवास अवघ्या पाच तासांत पूर्ण करणे शक्य होईल,’ असेही त्यांनी सांगितले.

# ‘महापौर निवास’ नाव बदलू नका, शरद पवारांच्या राष्ट्रवादीची मागणी!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महापालिकेने घोले रस्त्यावर बांधलेल्या महापौर निवासस्थानाचे नाव ‘रामदूत’ करण्यास राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा विरोध केला आहे. या वास्तूचे नाव बदलल्यास पक्षाच्या वतीने आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. भारतीय जनता पक्षाच्या (भाजपच्या) नगरसेवकांनी महापौर बंगल्याचे नाव बदलण्याची मागणी केली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव नाव समितीकडे देण्यात आला आहे. विशेष म्हणजे या मागणीला महापौर मंजूषा नागपुरे यांनी देखील समर्थन दर्शविले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार



### खड्ड्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

महापालिकेत सत्ताधारी म्हणून काम करणाऱ्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांना रस्त्यावर पडलेले खड्डे दिसत नाही का? की जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केले जाते, अशी विचारना देखील श्रीकांत पाटील यांनी केली आहे. पुणेकर रस्ते देण्यामध्ये महापालिकेतील भाजप पदाधिकारी अपयशी ठरले असल्याची टीका पाटील यांनी केली.

महापौर निवासस्थानाचे नाव बदलण्याचे नवीन पायंडे पाडले जाऊ नयेत. ‘महापौर निवास’ हेच नाव कायम ठेवावे,’ अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांनी केली. दरम्यान, ‘मुळा-मुठा नदीपात्रातील जलपर्णी काढण्यासाठी मंजूर करण्यात आलेली निविदा नक्की कोणासाठी काढण्यात आली,’ अशी विचारणा करून चुकीच्या पद्धतीने मर्जीतील ठेकेदारांना काम देणे थांबवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या वतीने करण्यात आली.

रस्त्यांवर पडलेले खड्डे, रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास याकडे लक्ष वेधून महापालिकेतील सत्ताधाऱ्यांचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य इमारतीच्या बाहेर आंदोलन करण्यात आले.




महापालिकेतील पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेवक गफूर पठाण, नगरसेविका अनिता इंगळे, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा स्वाती पोकळे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

शहराध्यक्ष श्रीकांत पाटील म्हणाले, ‘जलपर्णी नैसर्गिकरित्या वाहून गेल्यानंतरही जलपर्णी काढण्यासाठी निविदा काढून मान्य केल्या जातात. ही पुणेकरांच्या पैशाची उधळपट्टी आहे. मंजूर करण्यात आलेली निविदा तातडीने रद्द करावी. या निविदा प्रक्रियेची चौकशी करावी. तसेच, शहरातील अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून रस्त्यांची अवस्थाही दयनीय झालेली आहे.

रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील अनेक भागातील रस्त्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. वारंवार याबाबत आवाज उठवून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. मात्र महापालिकेतील सत्ताधारी भाजपचे पदाधिकारी, महापालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहेत.’ असा आरोप देखील यावेळी करण्यात आला.

# मोशीत उभारणार आदिवासी विकासाचे 'महाकेंद्र'!

## राज्य मंत्रिमंडळाची १५ हेक्टर शासकीय जमीन देण्यास मंजुरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडमधील मौजे मोशी (ता. हवेली) येथील १५ हेक्टर शासकीय जमीन क्रांतिवीर चापेकर समिती, क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय (चिंचवड गाव) आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रम शाळेला देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, या जागेवर मागास व वंचित आदिवासी समाजासाठी शिक्षण, संस्कार आणि सामाजिक विकासाचे सर्वांगीण केंद्र साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**




> "पद्मश्री गिरीश काका प्रभुणे यांनी केलेली मागणी आणि त्यामागील व्यापक सामाजिक उद्देश लक्षात घेऊन हा विषय शासनदरबारी सातत्याने मांडला. विधानसभा अधिवेशनादरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन जागेचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मागणीला सकारात्मक बळ दिले. अखेर मंत्रिमंडळाने १५ हेक्टर शासकीय जमीन देण्यास मंजुरी दिल्याने हा प्रश्न मार्गी लागला, याचा मनस्वी आनंद आहे. या केंद्रामुळे वंचित आदिवासी समाजातील मुलांना शिक्षण, संस्कार आणि विकासाच्या नव्या संधी मिळतील. पिंपरी-चिंचवड शहर व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी माझा पाठपुरावा यापुढेही असाच सुरू राहील."
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

क्रांतिवीर चापेकर समितीचे पद्मश्री गिरीश काका प्रभुणे यांनी या जागेची मागणी केली होती. त्यांच्या मागणीला राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला. विधानसभा अधिवेशनादरम्यान आमदार महेश लांडगे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या जागेचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली होती. या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सकारात्मक बळ दिले. त्यानंतर शासनस्तरावर प्रक्रिया गतिमान झाली आणि अखेर मंत्रिमंडळाच्या बैठकीत १५ हेक्टर शासकीय जमीन देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली.

आमदार महेश लांडगे यांनी 'क्रांतिवीर चापेकर समिती जागा मागणी' हा विषय सातत्याने शासनदरबारी लावून धरला होता. नुकतेच त्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र पाठवून पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित विषयांबाबत आढावा बैठक घेण्याची विनंती केली होती. यामध्ये या जागेच्या मागणीचाही समावेश होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आता या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती मिळणार आहे. मंजूर करण्यात आलेल्या या जागेवर क्रांतिवीर चापेकर समिती, क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रम शाळेच्या माध्यमातून मागास व वंचित आदिवासी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विकास केंद्र साकारले जाणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार, कौशल्यविकास आणि सामाजिक प्रगतीच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

या निर्णयाबद्दल आमदार महेश लांडगे यांनी राज्य शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत. सामाजिक समरसता, शिक्षण आणि वंचित घटकांच्या विकासाला चालना देणारे हे केंद्र पिंपरी-चिंचवड परिसरासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# वाकडचे गार्डन वाचवण्यासाठी Gen Alpha मैदानात!



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भूमकर चौक परिसरातील वाकडकर कॉर्नर येथील EON IT PARK शेजारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने प्रस्तावित केलेले गार्डन प्रत्यक्षात साकारण्याच्या मागणीसाठी आता चिमुकल्या 'GEN ALPHA'नेच आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. प्रस्तावित गार्डनच्या जागेवरच गार्डन झाले पाहिजे, या मागणीसाठी मुलांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले. "WE WANT GARDEN", "GARDEN झालेच पाहिजे", "आमच्या भविष्यासाठी गार्डन हवे" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.**

या जागेवर गार्डन उभारण्याबाबत यापूर्वी हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यामुळे लवकरच या ठिकाणी उद्यान साकारले जाण्याची अपेक्षा नागरिकांना होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून प्रस्तावित गार्डनच्या भवितव्याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून या विषयावर स्पष्ट माहिती मिळत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

विशेष म्हणजे, माहितीच्या अधिकारात माहिती मागूनही संबंधित माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे प्रस्तावित गार्डनच्या जागेबाबत पडद्यामागे काही वेगळे निर्णय घेतले जात आहेत का, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

आजच्या पिढीला मोबाईल, इंटरनेट आणि तंत्रज्ञानाची ओढ असली, तरी त्याचबरोबर खेळण्यासाठी मैदान, मोकळी जागा, झाडे-हिरवाई आणि स्वच्छ पर्यावरणाचीही तितकीच गरज आहे. त्यामुळे भविष्यातील पिढीच्या आरोग्याचा आणि मानसिक विकासाचा विचार करून गार्डनची जागा जपली पाहिजे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### आंदोलनाचा इशारा...

प्रस्तावित गार्डनबाबत महानगरपालिका प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, गार्डनचा प्रस्ताव रद्द केला जाणार नाही याची हमी द्यावी आणि त्याच जागेवर गार्डनच्या कामाला सुरुवात करावी, अशी मागणी करण्यात आली. या मागणीवर प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय घेतला नाही, तर GEN ALPHA च्या नेतृत्वाखाली मोठे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासनाने या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून मुलांच्या मागणीची दखल घ्यावी आणि भविष्यातील पिढीसाठी असलेली हिरवीगार जागा वाचवावी, अशी मागणी वाकड-ताथवडे हौसिंग फोरमच्या वतीने करण्यात आली.

### 'गार्डन रद्द करू नका; याच जागेवर उभारा'

या पार्श्वभूमीवर परिसरातील GEN ALPHA मधील मुलांनी पुढाकार घेत प्रस्तावित गार्डनच्या जागेवर आंदोलन केले. गार्डनसाठी उपलब्ध असलेली जागा अन्य कोणत्याही कारणासाठी वापरण्याऐवजी EON IT PARK शेजारी प्रस्तावित असलेल्या याच जागेवर गार्डन साकारण्यात यावे, अशी ठाम भूमिका मुलांनी मांडली.



## भूमिका

**उच्च शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचे वळण असते. प्रवेश परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थी आपली गुणवत्ता, मेहनत आणि स्पर्धात्मक क्षमता सिद्ध करतात. मात्र, ही कठीण परीक्षा पार केल्यानंतर प्रत्यक्ष महाविद्यालयीन प्रवेशासाठी सुरू होणारी प्रदीर्घ आणि किचकट प्रक्रिया विद्यार्थ्यांसाठी नवा ताण ठरू नये.**

# कटकटीच्या प्रवेशातून मुक्ती, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गती!

प्रवेश प्रक्रिया जितकी सुलभ, पारदर्शक आणि गतिमान असेल, तितकाच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि अभ्यासावरील उत्साह वाढेल. आजचा विद्यार्थी तंत्रज्ञानस्नेही आहे. त्याला डिजिटल व्यवहारांची सवय आहे. मग उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी पुन्हा पुन्हा कागदपत्रे जमा करणे, पडताळणीसाठी रांगा लावणे, विविध संकेतस्थळांवर माहिती शोधणे आणि प्रवेशाच्या अनेक फेऱ्यांची प्रतीक्षा करणे कितपत योग्य आहे? प्रवेश प्रक्रियेतील अनिश्चितता विद्यार्थ्यांचा वेळ आणि ऊर्जा दोन्ही खर्च करते.




विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना अशा प्रक्रियेत अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. शिक्षण व्यवस्थेचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांना परीक्षार्थी बनवणे नसून त्यांना ज्ञानार्थी, संशोधक आणि विचारशील नागरिक घडवणे हा असायला हवा. त्यामुळे प्रवेशानंतरचा प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी महत्त्वाचा आहे.

प्रवेश प्रक्रियेत अनावश्यक विलंब झाला तर शैक्षणिक वर्षाचे नियोजन बिघडते. वर्ग उशिरा सुरू होतात, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिक्षकांवर वेळेचे दडपण येते आणि विद्यार्थ्यांना घाईघाईने विषय शिकावे लागतात. याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होतो. यावर प्रभावी उपाय म्हणून डिजिटल तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक वापर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज भरतानाच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांची प्राथमिक डिजिटल पडताळणी पूर्ण करता येऊ शकते. एकच केंद्रीकृत प्रणाली वापरल्यास विद्यार्थ्यांना वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी माहिती सादर करण्याची गरज राहणार नाही. प्रवेशाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती विद्यार्थ्यांना त्यांच्या मोबाईलवर तत्काळ मिळणेही आवश्यक आहे.

प्रवेश प्रक्रियेसाठी स्पष्ट आणि कालबद्ध वेळापत्रक असावे. निकाल जाहीर झाल्यानंतर दोन-तीन आठवड्यांत वर्ग सुरू होतील, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. महाविद्यालयांमध्ये सक्षम हेल्प डेस्क आणि तांत्रिक मार्गदर्शन केंद्रे असावीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन अर्जातील चुका आणि तांत्रिक अडचणी वेळेत दूर करता येतील.

प्रवेश प्रक्रियेतील सुलभता ही केवळ विद्यार्थ्यांची सोय नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेशी संबंधित बाब आहे. प्रवेशाचा कालावधी कमी झाला तर विद्यार्थ्यांना अवांतर वाचन, कौशल्यविकास, संशोधन, प्रात्यक्षिके आणि विविध उपक्रमांसाठी अधिक वेळ मिळेल. पालकांनाही वेळेवर प्रवेश आणि शुल्काची स्पष्ट माहिती मिळाल्याने आर्थिक नियोजन करणे सोपे होईल.

विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांच्या स्वप्नांना प्रशासकीय प्रक्रियेच्या गुंतागुंतीत अडकवण्याऐवजी त्यांना शिकण्यासाठी, विचार करण्यासाठी आणि नवे निर्माण करण्यासाठी वेळ देणे ही शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी आहे. प्रवेश प्रक्रिया ही विद्यार्थ्यांसाठी अडथळ्यांची नव्हे, तर नव्या शैक्षणिक प्रवासाची आनंददायी सुरुवात ठरली पाहिजे. सुलभ प्रवेश, वेळेवर शिक्षण आणि ज्ञानकेंद्रित व्यवस्था—याच दिशेने उच्च शिक्षण व्यवस्थेने पुढे जाण्याची गरज आहे.

## प्रासंगिक »

### चातुर्याची खरी कसोटी

**एका गावात मोहन नावाचा हुशार मुलगा राहत होता. एकदा गावच्या बाजारात एका व्यापाऱ्याची पैशांची पिशवी हरवली. व्यापाऱ्याने गावकऱ्यांना मदतीचे आवाहन केले. अनेकांनी शोध घेतला; पण पिशवी सापडली नाही.**

मोहन बाजारातून जात असताना त्याला एका दुकानाच्या मागे ती पिशवी दिसली. त्याने ती उचलली आणि व्यापाऱ्याकडे नेली. व्यापाऱ्याने पिशवी तपासली. त्यातील सर्व पैसे सुरक्षित होते. त्याने मोहनला बक्षीस देऊ केले.

मोहन म्हणाला, “मला बक्षीस नको. तुमची वस्तू तुम्हाला परत मिळाली, एवढेच पुरेसे आहे.” हे ऐकून व्यापारी म्हणाला, “हुशारी म्हणजे फक्त कठीण प्रश्न सोडवणे नव्हे; योग्य वेळी योग्य निर्णय घेणे हीच खरी हुशारी आहे.”

गावकऱ्यांनी मोहनचे कौतुक केले. त्या दिवसापासून गावातील मुले त्याच्याकडून शिकू लागली की बुद्धीचा उपयोग केवळ स्वतःच्या फायद्यासाठी नव्हे, तर इतरांच्या हितासाठीही करावा.

- तात्पर्य : खरी हुशारी ही ज्ञानात नसून त्याचा योग्य उपयोग करण्यात असते.

शहरे म्हणजे केवळ इमारती, रस्ते आणि माणसांची गर्दी नव्हे; ती सतत धडधडणारी, बदलणारी आणि माणसांच्या स्वप्नांना आकार देणारी जिवंत व्यवस्था असते. शहरांचा वेग कधी कधी अमानुष वाटतो.

# धावत्या शहरांचं अजब आकर्षण!

वाहतूककोंडी, गर्दी, प्रदूषण, महागाई, धावपळ आणि ताण यामुळे शहरजीवन त्रासदायकही ठरते. तरीही माणूस शहरांकडे आकर्षित होतो. कारण या धावपळीतही शहर त्याला संधी, स्वातंत्र्य, मनोरंजन आणि नव्या अनुभवांचे विश्व देत असते.

पहाटे दूधवाला, पेपरवाला आणि भाजीवाला यांची लगबग सुरू होते आणि मध्यरात्री चित्रपटगृहाबाहेरची गर्दी रस्त्यावर उतरते. कार्यालयीन वेळेत गजबजलेले रस्ते, सतत धावणारी वाहने, माणसांनी फुललेली बाजारपेठा आणि अहोरात्र सुरू असलेली रेल्वेस्थानके शहराच्या जिवंतपणाची साक्ष देतात. नाटक, सिनेमा, संगीत, क्रीडा, प्रदर्शन, व्याख्याने, आंदोलनांपासून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांपर्यंत असंख्य घडामोडी शहराच्या जीवनाला सतत नवा रंग देत असतात.



शहरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यातील विरोधाभास. एका बाजूला झोपडपट्ट्या, तर दुसऱ्या बाजूला गगनचुंबी इमारती; जुन्या वास्तूंच्या शेजारी आधुनिक काचेच्या इमारती; अरुंद गल्ल्यांच्या पुढे रुंद महामार्ग; समुद्रकिनाऱ्याच्या शेजारी अस्वच्छ नाले—हे सारे विरोधाभास शहर सहजपणे सामावून घेते. म्हणूनच शहराला एका चौकटीत बांधणे शक्य होत नाही. त्याचे खरे रूप सतत बदलत राहते. शहरे माणसांना संधी देतात, पण त्याच वेळी स्पर्धेलाही सामोरे जाण्यास भाग पाडतात. येथे कर्तृत्वाला मोठे व्यासपीठ मिळते. एखादा तरुण उद्योग उभा करतो, कलाकार आपली कला जगासमोर आणतो, व्यापारी व्यवसाय वाढवतो, तर संशोधक नव्या कल्पनांना आकार देतो. याच गर्दीत गुन्हेगारी आणि गैरप्रवृत्तीही वाढतात. त्यामुळे शहर हे चांगल्या-वाईट दोन्ही प्रवृत्तींचे मिश्रण असते. शहरांची खरी ताकद त्यांच्या सतत बदलण्यात आहे. तंत्रज्ञान बदलते, वाहतूक बदलते, बाजारपेठा बदलतात, जीवनशैली बदलते आणि त्याबरोबर शहरांचे रूपही बदलते. भूतकाळाच्या खुणा जपत आधुनिकतेकडे वाटचाल करणारी ही शहरे अनेक पिढ्यांना एकाच वेळी सामावून घेतात. परंपरा आणि आधुनिकता यांचा हा संगम शहरांना वेगळेपण देतो. लहान शहरांतील किंवा गावांतील ओळखीचे सामाजिक वर्तुळ माणसाला सुरक्षितता देते; मात्र कधी कधी तेच त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणते.

मोठे शहर मात्र अनोळखीपणातून एक वेगळे स्वातंत्र्य देते. येथे माणूस स्वतःची नवी ओळख निर्माण करू शकतो. म्हणूनच शहराशी माणसाचे नाते प्रेमाचेही असते आणि तक्रारीचेही. शहरांची धावपळ थांबणारी नाही. तरीही त्यांच्या अविरत चैतन्यात, विविधतेत आणि संधींच्या अमर्याद शक्यतांमध्ये माणसाला काहीतरी नवे सापडत राहते. म्हणूनच शहरे थकवतात, पण कंटाळवत नाहीत; धावायला लावतात, पण स्वप्ने पाहायलाही शिकवतात. माणसांच्या असंख्य इच्छा, संघर्ष आणि स्वप्नांचे जिवंत प्रतिबिंब म्हणजेच शहर.

## ।। अभंगवाणी ।।



चित्त समाधानें ।
तरी विष वाटे सोनें ॥१॥

बहु खोटा अतिशय ।
जाणां भले सांगों काय ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पंतप्रधान मोदी बारामतीत येणार

## विद्या प्रतिष्ठानमधील कार्यक्रमाचा मुहूर्त ठरला; शरद पवारांनी दिली माहिती

**महाईन्यूज । बारामती**

**"विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात उभारण्यात आलेल्या वास्तूमध्ये गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यासह समाजाला दिशा देणाऱ्या महापुरुषांच्या कर्तृत्वाचे दर्शन घडवणारे प्रेरणास्थान उभारण्यात येणार आहे. या वास्तूचे उद्घाटन विद्या प्रतिष्ठानच्या स्थापना दिनानिमित्त १६ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत करण्याचा विचार आहे," अशी माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे.**



विद्या प्रतिष्ठानमध्ये उभारलेल्या या वास्तूमध्ये विविध महापुरुषांचे फोटो लावण्यात येणार असून, त्यासाठी उत्तम कलाकारांकडून त्यांची चित्रे तयार करून घेण्यात आली आहेत. राजर्षी शाहू महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सयाजीराव गायकवाड, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, यशवंतराव चव्हाण आणि शारदाबाई पवार यांना या ठिकाणी प्रेरणास्थान म्हणून स्थान देण्यात येणार आहे. या महापुरुषांनी समाजासाठी केलेले कार्य, त्यांचे विचार, कर्तृत्व आणि योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, हा या संकल्पनेमागील उद्देश असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना या व्यक्तिमत्त्वांच्या कार्याची माहिती मिळावी, यासाठी त्यांच्या जीवनकार्याची माहितीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशभर विविध ठिकाणी बारव, विहिरी आणि पाणवठे उभारून जनतेसाठी पाण्याची सुविधा निर्माण केली. त्यांच्या या कार्याचे स्मरण म्हणून जिरायती भागात बारव उभारण्याची कल्पनाही मांडण्यात आली आहे. पाण्याची टंचाई असलेल्या भागात अशा स्वरूपाच्या जलसंधारणाच्या उपाययोजना उभारण्याचा विचार असल्याचे पवार यांनी सांगितले.

दरम्यान, महिला कार्यकर्त्यांना अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती वाचण्यासाठी देण्यात आली होती. त्यावेळी माहिती वाचताना झालेली एक चूक शरद पवार यांच्या निदर्शनास आली. महापुरुषांच्या कार्याची माहिती देताना संदर्भ आणि तपशील अचूक असणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

विद्या प्रतिष्ठानच्या स्थापना दिनानिमित्त १६ ऑक्टोबर रोजी या प्रेरणास्थानाचे उद्घाटन करण्याचा विचार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला. महापुरुषांचे विचार आणि त्यांचे समाजासाठीचे योगदान पुढील पिढीला समजावे, या उद्देशाने उभारण्यात येणारे हे प्रेरणास्थान महत्त्वाचे ठरणार आहे.

### पवार-मोदींमधील वाढती जवळीक

मागील काही दिवसांपासून शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएमध्ये सहभागी होण्याचीही जोरदार चर्चा होत आहे. एकीकडे कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरु असताना त्याच काळात जुलै महिन्यात शरद पवारांनी पंतप्रधान मोदींची भेट घेतली होती. त्यानंतर शरद पवारांचे सर्व खासदार सुप्रिया सुळेंच्या नेतृत्वाखाली पंतप्रधान मोदींना दिल्लीत भेटले होते. याच महिन्यामध्ये पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनी नवी दिल्लीमध्ये सुप्रिया सुळे यांची कन्या आणि शरद पवारांची नात रेवती सुळे यांच्या लग्नाच्या रिसेप्शनला हजेरी लावली होती.

# दाभोलकर हत्या प्रकरण: दोषसिद्ध आरोपी सचिन अंदुरेला जामीन

**महाईन्यूज । मुंबई**

**अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झालेला दोषसिद्ध आरोपी सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी जामीन मंजूर केला.**



न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने अंदुरे याला सत्र न्यायालयाने २०२४ मध्ये सुनावलेली जन्मठेपेची शिक्षाही यावेळी स्थगित केली. या सविस्तर आदेशाची प्रत अद्याप उपलब्ध झालेली नाही. अंदुरे याच्यावर कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणीही खटला सुरू आहे; मात्र दोन्ही प्रकरणांत त्याला जामीन मिळाल्यामुळे अंदुरे आता तुरुंगातून बाहेर येऊ शकतो.

डॉ. दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात प्रभातफेरीला गेले असताना दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास स्थानिक पोलिसांकडून केला जात होता, परंतु त्यांची कन्या मुक्ता दाभोलकर यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेनंतर २०१४ मध्ये प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला. अंदुरे हा गोळ्या झाडणाऱ्यांपैकी एक होता, असा दावा सरकारी पक्षाने केला होता.

त्यानंतर, १० मे २०२४ रोजी पुणेस्थित सत्र न्यायालयाने दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी अंदुरे आणि शरद कळसकर या दोघांना दोषी ठरवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, कठोर अशा बेकायदा कृत्ये प्रतिबंधक कायदा (यूएपीए) व शस्त्र कायद्यांतर्गत दाखल आरोपांतून त्यांची निर्दोष मुक्तता केली होती. त्याचवेळी, न्यायालयाने डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, वकील संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली होती.

अंदुरे याने दोषी ठरवण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे आणि एका अंतरिम अर्जाद्वारे जामीन व जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याची मागणी केली होती. न्यायालयाने मंगळवारी त्याचा हा अर्ज मंजूर केला.

### दाभोलकर कुटुंबीयही न्यायालयात

दाभोलकर यांची कन्या मुक्ता यांनीही या प्रकरणातील तीन आरोपींची निर्दोष सुटका करण्याचा निर्णय आणि अंदुरे व कळसकर यांच्यावरील यूएपीएअंतर्गत दाखल आरोप रद्द करण्याच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. ही हत्या उजव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांच्या मोठ्या कटाचा भाग होती, असा आरोप त्यांनी आपल्या अपिलात केला आहे. दाभोलकर यांची हत्या ही अन्य तीन विवेकवादी आणि कार्यकर्त्यांच्या अशाच प्रकारच्या हत्यांच्या मालिकेतील पहिली घटना होती. त्यानंतर फेब्रुवारी २०१५ मध्ये पानसरे यांची कोल्हापूरमध्ये हत्या झाली. पुढे, कन्नड भाषेतील अभ्यासक एम. एम. कलबुर्गी यांची धारवाड येथे ऑगस्ट २०१५ मध्ये, तर पत्रकार गौरी लंकेश यांची बेंगळुरू येथे सप्टेंबर २०१७ मध्ये हत्या झाली होती.

# इम्रान खान यांची प्रकृती ढासळली!

## तातडीने रुग्णालयात दाखल करण्याचे पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाचे आदेश!

**महाईन्यूज** | पाकिस्तान

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. खान यांची ढासळलेली प्रकृती विचारात घेता त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करणाचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. इम्रान खान यांचा पक्ष पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ आणि त्यांच्या कुटुंबियांनी खान यांना रुग्णालयात दाखल करण्याची मागणी केली होती.**



इम्रान खान यांना पुढील ४८ तासांत शिफा आंतरराष्ट्रीय हॉस्पिटलमध्ये हलविण्यात यावे आणि १६ सप्टेंबरपर्यंत तिथं ठेवावे असे आदेश न्यायालयाने दिले आहेत, अशी माहिती तहरीक-ए-इन्साफ पक्षाचे प्रवक्ते नईम हैदर पंजुथा यांनी दिली आहे. खान आणि त्यांच्या कुटुंबियांची दर आठवड्याला भेट व्हावी असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. इम्रान खान यांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी एक वैद्यकीय पथक तयार करण्यात यावे असेही आदेश न्यायालयाने दिले आहेत.

वैद्यकीय पथकात पक्षाच्या नेत्यांचे डॉक्टर आणि खान यांच्या बहीण डॉ. उज्मा खान यांचा समावेश करण्यात यावा, असे या आदेशात म्हटले आहे. दरम्यान, कोर्टाने इम्रान खान यांचे वैद्यकीय अहवाल मीडिया बरोबर शेअर न करण्याचे आवाहन वकील आणि कुटुंबियांना केले आहे. तसेच, या विषयाचे राजकारण न करण्याचे आवाहन देखील केले आहे. इम्रान खान ऑगस्ट २०२३ पासून तुरुंगात आहेत.

इम्रान खान यांच्या तब्येतीबाबत त्यांचे कुटुंबीय वारंवार शंका उपस्थित करत आहेत. त्यांना उपचाराची गरज असून रुग्णालयात हलविण्यात यावे अशी मागणी करत आहेत. खान यांच्या मुलाने याबाबत प्रश्न उपस्थित केले होते. तुरुंगात असल्यापासून इम्रान यांच्या उजव्या डोळ्याची दृष्टी कमी झाल्याचा दावा केला जात आहे. पाकिस्तानमधील राजकीय नेत्यांनी देखील खान यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली होती. इम्रान खान यांना विविध शारीरिक आणि मानसिक त्रास होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### राजकीय नेत्यांनीही उठवला आवाज

पाकिस्तानचे माजी सभापती आरिफ अल्वी आणि पीटीआय पक्षाचे प्रवक्ते जुल्फीकार बुकारी यांनी इम्रान खान यांच्या तब्येतीबाबत चिंता व्यक्त केली होती. इम्रान यांच्याविरोधात अविश्वास ठराव मांडण्यात आला होता. यात पराभव झाल्यानंतर खान यांचे सरकार कोसळले. खान यांच्याविरोधात विविध खटले चालविण्यात आले व दोषी ठरवून तुरुंगात टाकण्यात आले.

# फाशी ऐवजी विषारी इंजेक्शन देण्याची मागणी; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**महाईन्यूज** | नवी दिल्ली

**मृत्युदंडाची शिक्षा देण्यासाठी फाशीऐवजी कमी वेदनादायी दुसरा एखादा पर्याय दिला जावा, यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर आज महत्त्वपूर्ण निकाल देण्यात आला आहे. फाशीचा पर्याय हा वेदनादायी असून यापेक्षा विषारी इंजेक्शन किंवा इतर पर्यायावर विचार केला जावा, अशी याचिका करण्यात आली होती. मात्र न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. मृत्यूदंडाची शिक्षा देण्यासाठी फाशीचा पर्याय हाच वैध असेल, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.**



सर्वोच्च न्यायालयाने इतर शिक्षेच्या पद्धतींना विरोध केला असला तरी जर कमी वेदनेच्या शिक्षेला एखादा वैज्ञानिक किंवा वैद्यकीय पुरावा मिळाल्यास त्याचा विचार करण्यात येईल, असेही न्यायालयाने सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचे आणि कमी वेदनेच्या मृत्यूदंडाच्या शिक्षेच्या पर्यायावर विचार करण्याचे आवाहन केले.

ज्येष्ठ वकील ऋषी मल्होत्रा हे २०१७ सालापासून फाशीच्या शिक्षेविरोधात याचिकेच्या मार्गाने लढत आहेत. "मृत्युदंडाची शिक्षा सन्मानपूर्वक मिळणे, हादेखील व्यक्तीचा अधिकार आहे. एखाद्या व्यक्तीचे जीवन अशा शिक्षेमुळे संपत असेल तर ती शिक्षा वेदनारहित असली पाहिजे. अनेक देशांमध्ये फाशीची शिक्षा आता दिली जात नाही. अमेरिकेतील ३६ राज्यांनी फाशीची शिक्षा देणे बंद केले आहे", असा युक्तिवाद मल्होत्रा यांनी यापूर्वीच केला होता.

याचिकेच्या माध्यमातून मल्होत्रा यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (CRPC) कायद्यातील कलम ३५४ (५) च्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले. या कलमानुसार शिक्षेची तरतूद अशी आहे, "जेव्हा एखाद्या व्यक्तीला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली जाते, तेव्हा त्याच्या गळ्यात दोर लटकवून मरेपर्यंत फासावर लटकवावे," असे निर्देश या कलमांतर्गत देण्यात आले आहेत.

मल्होत्रा यांनी फाशीच्या शिक्षेऐवजी विषारी इंजेक्शन, गोळीबार, विजेचा धक्का आणि गॅस चेंबर यासारख्या इतर पद्धतींचा वापर करण्याची मागणी केली होती. फाशीमुळे मृत्यू येण्यासाठी जवळपास ४० मिनिटे लागतात. त्यानंतर डॉक्टर येऊन मृत्यू झाला की नाही, याची तपासणी करतात. हा पर्याय खूप अमानवीय आहे. यापेक्षा विषारी इंजेक्शन, गोळी झाडणे किंवा विजेचा धक्का देऊन काही मिनिटांतच व्यक्तीचा मृत्यू होतो, अशा पर्यायांवर विचार झाला पाहिजे, अशी मल्होत्रा यांची मागणी होती.

लाईव्ह लॉने दिलेल्या वृत्तानुसार, मार्च २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महाधिवक्ता आर. वेंकटरमानी यांना फाशीच्या शिक्षेनंतर होणाऱ्या वेदनेची माहिती गोळा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. फाशी दिल्यानंतर मृत्यू होण्यासाठी किती वेळ लागतो किंवा या पद्धतीशी निगडित इतर कोणते मुद्दे आहेत, हेदेखील तपासण्याचे आदेश देण्यात आले होते.

बार अँड बेंचने दिलेल्या वृत्तानुसार, खंडपीठाने पुढे म्हटले की, पूर्वीच्या निर्णयातील तथ्ये बदलली असल्याचे ठोस वैज्ञानिक आणि वैद्यकीय पुरावे दिसून आलेले नाहीत. फाशीची शिक्षा वैध आहे की नाही, या प्रश्नावर भविष्यात विचार केला जाऊ शकतो. विज्ञानातील बदल आणि नवीन घडामोडी लक्षात घेऊन संविधानाचा अर्थ लावला पाहिजे, असेही खंडपीठाने म्हटले.


### फाशीची शिक्षा रद्द करण्यास विरोध का?

खंडपीठातील न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांनी म्हटले की, फाशीच्या शिक्षेच्या वापराला मान्यता देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी याचिकाकर्त्याने पुरेसे कारण दिलेले नाही. दिना प्रकरणातील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाचा निर्णय मोठ्या खंडपीठाकडे वर्ग करण्यासाठी पुरेसा पुरावे असे आम्हाला वाटत नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.



# सोनाक्षी राजकारणात येणार ?

बॉलिवूडमधील अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा अनेकदा सामाजिक आणि राजकीय मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्टपणे मांडताना दिसते. सीजेपीच्या आंदोलनाला तिने पाठिंबा दर्शवला होता. त्यावेळी तिची भूमिका सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली होती. मात्र, झारखंडमधील विद्यार्थी आंदोलनाच्या मुद्द्यावर सोनाक्षीने मौन बाळगल्याची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. याच पार्श्वभूमीवर तिचे वडील आणि ज्येष्ठ अभिनेते-राजकारणी शत्रुघ्न सिन्हा यांनी एका न्यूज चॅनेलसोबत संवाद साधला. यावेळी सोनाक्षी आगामी काळात राजकारणात प्रवेश करणार का? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. यावर त्यांनी महत्वाचा खुलासा केला आहे. मुलीच्या राजकीय भूमिकेबाबत आणि ती भविष्यात राजकारणात प्रवेश करणार का, या प्रश्नावर उत्तर देताना शत्रुघ्न सिन्हा यांनी एक सूचक वक्तव्य केले. “मी सांगू शकत नाही. मी आधी तिलाच विचारायचो.” पुढे ते म्हणाले, “मी एवढेच म्हणू शकतो की ती एका अत्यंत योग्य वडिलांची अत्यंत योग्य मुलगी आहे.” दरम्यान, शत्रुघ्न सिन्हा यांच्या वक्तव्यानंतर सोनाक्षी भविष्यात राजकारणात प्रवेश करणार का, याबाबत चर्चा रंगू लागली आहे.



# हॉलिवूडवर शोककळा!

हॉलिवूडमधून एक दुःखद बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध अमेरिकन अभिनेत्री हेडन पॅनेटीयर यांचे वयाच्या 36व्या वर्षी निधन झाले. ‘हीरोज’ आणि ‘नॅशविले’ या लोकप्रिय मालिकांमधील भूमिकांमुळे त्या जगभरात प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने मनोरंजन विश्वात शोककळा पसरली आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत निधनाची पुष्टी केली आहे. हेडन यांचा वाढदिवस 21 ऑगस्ट रोजी होता. मात्र, वाढदिवसाच्या अवघ्या पाच दिवस आधीच त्यांचे निधन झाले. त्या 37वा वाढदिवस साजरा करण्याच्या तयारीत असतानाच ही दुःखद बातमी समोर आली. त्यांच्या कुटुंबीयांनी अभिनेत्रीच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. हेडन यांनी आपल्या अभिनयातून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आणि त्यांच्या कामामुळे अनेकांच्या आयुष्यात आनंद आणला, अशी भावना त्यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली. हेडन पॅनेटीयर यांनी अगदी लहान वयातच मनोरंजन क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली होती. बालकलाकार म्हणून काम करताना त्यांनी टेलिव्हिजनसोबतच चित्रपटांमध्येही भूमिका साकारल्या. नंतर त्यांनी मोठ्या पडद्यावर आणि टीव्ही मालिकांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या कारकिर्दीत अनेक लोकप्रिय प्रोजेक्ट्सचा समावेश आहे. हेडन यांना सर्वाधिक प्रसिद्धी ‘हीरोज’ या सायन्स-फिक्शन मालिकेमुळे मिळाली. या मालिकेत त्यांनी क्लेअर बेनेट ही भूमिका साकारली होती. या भूमिकेमुळे त्या घराघरात पोहोचल्या आणि त्यांना मोठा चाहतावर्ग मिळाला. यानंतर त्यांनी ‘नॅशविले’ या म्युझिकल ड्रामामध्ये ज्युलिएट बार्न्सची भूमिका साकारली.

# ‘कहानी’ फ्रेंचाइजीमध्ये यामी



सुजॉय घोषचा चित्रपट ‘कहानी’मध्ये विद्या बालन मुख्य भूमिकेत होती. या चित्रपटाला आजही बॉलिवूडमधील सर्वोत्कृष्ट थ्रिलरपटांपैकी एक मानले जाते. 2012 मध्ये प्रदर्शित हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला होता. 2016 साली याचा सीक्वेल ‘कहानी 2’ प्रदर्शित झाला ,ज्याला बॉक्स ऑफिसवर फारशी छाप पाडता आली नव्हती. आता कहानी 3 चित्रपट निर्माण करण्याची योजना पुढे सरकत असून यात यावेळी विद्या बालन मुख्य भूमिकेत नसणार आहे. या फ्रेंचाइजीमध्ये यामी गौतमची निवड करण्याचा विचार सुरू आहे. कहानी 3 पूर्णपणे एक नवी कहाणी मांडणारा चित्रपट असेल. यामी गौतम यात मुख्य भूमिकेत असेल आणि तिची भूमिका अत्यंत दमदार असणार आहे. चित्रपट सध्या निर्मितीपूर्व टप्प्यात असून टीम शूटिंगच्या टाइमलाइनवर काम करत आहे. सुजॉय घोषच या कहानी 3 चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे.

# ऋषभ पंतने रचला नवा इतिहास

## कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०० षटकार मारणारा ठरला जगातील पहिला फलंदाज

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारतीय संघाचा धडाकेबाज यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतने कसोटी क्रिकेटमध्ये नवा जागतिक विक्रम रचत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात भारतीय क्रिकेटमधील कोणत्याही दिग्गजाला जे साध्य करता आले नाही, तो अनोखा पराक्रम पंतने करून दाखवला आहे.**




श्रीलंका संघाविरुद्ध गॉल येथे खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतीय डावात दुसरा षटकार खेचताच पंतच्या नावावर कसोटी क्रिकेटमधील १०० षटकारांची नोंद झाली. या विक्रमी कामगिरीसह त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी यष्टिरक्षक ॲडम गिलख्रिस्टच्या १०० षटकारांच्या विक्रमाशी बरोबरी साधली असून, चेंडू आणि डावांच्या संख्येचा विचार करता जगातील सर्वात जलद १०० षटकार ठोकण्याचा विश्वविक्रम आता पंतच्या नावावर नोंदवला गेला आहे.

भारत आणि श्रीलंका यांच्यातील गॉल कसोटीच्या चौथ्या दिवशी भारताच्या दुसऱ्या डावात ऋषभ पंतने नेहमीच्या आक्रमक आणि आकर्षक शैलीत फलंदाजीचे अप्रतिम प्रदर्शन घडवले. मैदानावर चौफेर फटकेबाजी करताना त्याने षटकारासह आपले वैयक्तिक अर्धशतक पूर्ण केले आणि त्याच फटक्यासोबत आपल्या कसोटी कारकिर्दीतील षटकारांचे शतकही साजरे केले.

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार ठोकणाऱ्या फलंदाजांच्या यादीत पंत आता संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. या यादीत इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स १३८ षटकारांसह पहिल्या, तर न्यूझीलंडचा माजी फलंदाज ब्रेंडन मॅक्युलम १०७ षटकारांसह दुसऱ्या स्थानावर आहे. पंत आणि गिलख्रिस्ट प्रत्येकी १०० षटकारांसह संयुक्त तिसऱ्या स्थानावर असून, त्यांच्या मागे ख्रिस गेल (९८), टिम साऊदी (९८), जॅक कॅलिस (९७) आणि भारताचा वीरेंद्र सेहवाग (९१) यांचा क्रमांक लागतो.

कसोटीत १०० षटकार पूर्ण करण्यासाठी लागलेल्या चेंडूंच्या गतीचा विचार केला, तर पंतची कामगिरी अचंबित करणारी ठरली आहे. पंतने अवघ्या ४ हजार ९१८ चेंडूंचा सामना करत हा जागतिक टप्पा गाठला आहे. यापूर्वी हा विश्वविक्रम ॲडम गिलख्रिस्टच्या नावावर होता, ज्याने १०० षटकार पूर्ण करण्यासाठी ६ हजार ५७८ चेंडू खेळून काढले होते. या क्रमवारीत बेन स्टोक्सने ९ हजार ४२ चेंडू तर ब्रेंडन मॅक्युलमने तब्बल ९ हजार ७५६ चेंडूंचा सामना केला होता. केवळ चेंडूंच्या बाबतीतच नव्हे, तर सर्वात कमी डावांमध्ये हा पल्ला गाठण्याचा विक्रमही पंतने आपल्या नावे केला आहे. पंतने अवघ्या ८९ डावांमध्ये हा पराक्रम नोंदवला, तर गिलख्रिस्टला १३० डाव, बेन स्टोक्सला १५१ डाव आणि मॅक्युलमला १७० डाव खेळावे लागले होते.

### ३०० हून अधिक धावांची भक्कम आघाडी

पंतच्या या वादळी आणि अर्धशतकी खेळीमुळे भारतीय संघाने सामन्याच्या चौथ्या दिवशी दुसऱ्या डावात ३०० हून अधिक धावांची भक्कम आघाडी मिळवली असून, सामन्यावरील आपली पकड अधिक मजबूत केली आहे. कसोटीच्या चौथ्या डावात एवढ्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करणे कोणत्याही संघासाठी आव्हानात्मक मानले जाते. त्यामुळे भारतीय गोलंदाजांच्या कामगिरीच्या जोरावर संघ या गॉल कसोटीत विजयाची नोंद करण्याच्या अगदी जवळ पोहोचला आहे. दरम्यान, पंतच्या आक्रमक फलंदाजीने भारतीय संघाला निर्णायक स्थितीत नेले असून, आता विजयासाठी गोलंदाजांकडून दमदार कामगिरीची अपेक्षा आहे.

# राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराची घोषणा; 17 खेळाडूंना अर्जुन पुरस्कार

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**केंद्र सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2025 जाहीर केले आहेत. यंदा देशातील 17 खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मात्र, भारतातील क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणाऱ्या मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासाठी यंदा एकाही खेळाडूची निवड झालेली नाही.**






निवृत्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरुण कुमार मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या शिफारशींनुसार या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली.

यंदाच्या अर्जुन पुरस्कार विजेत्यांमध्ये अनेक वेगवेगळ्या खेळांतील खेळाडूंचा समावेश आहे. यात तेजस्विन शंकर, धावपटू मुहम्मद अजमल व्ही आणि प्रियंका गोस्वामी, बॅडमिंटनपटू ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद, बुद्धिबळ खेळाडू विदित गुजराथी आणि दिव्या देशमुख यांचा समावेश आहे.

तसेच हॉकीपटू लालरेमसियामी आणि राजकुमार पाल, नेमबाज अखिल श्योराण, पॅरा नेमबाज रुद्रांश खंडेलवाल, पॅरा ॲथलीट एकता भ्यान, रोइंगपटू अरविंद सिंह, बॉक्सर नरेंद्र, कबड्डीपटू सुरजीत आणि पूजा, तसेच नेमबाज धनुष श्रीकांत यांनाही अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

माजी भारतीय फुटबॉलपटू आय. अरुमैनायगम यांना अर्जुन पुरस्काराच्या जीवनगौरव श्रेणीत सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी 1962 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या संघात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी तीन वेळा ड्युरंड कपही जिंकला आहे.

यंदा सर्वात मोठी बाब म्हणजे मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासाठी एकाही खेळाडूची निवड करण्यात आलेली नाही. हा भारतातील क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार मानला जातो.

गेल्या वर्षी मात्र चार खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार देण्यात आला होता. त्यामध्ये बुद्धिबळ विश्वविजेता डी. गुकेश, भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंह, पॅरा ॲथलीट प्रवीण कुमार आणि ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर यांचा समावेश होता.

### प्रशिक्षकांनाही मिळाला सन्मान

यंदाच्या द्रोणाचार्य पुरस्काराच्या श्रेणीत ॲथलेटिक्स प्रशिक्षक परवीर सिंह, बॉक्सिंग प्रशिक्षक छोटेलाल यादव आणि नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चव्हाण यांची निवड झाली आहे. तर जीवनगौरव श्रेणीत बॉक्सिंग प्रशिक्षक धर्मेंद्र सिंह यादव आणि कुस्ती प्रशिक्षक वीरेंद्र कुमार यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जाणारा राष्ट्रीय खेळ प्रोत्साहन पुरस्कार यंदा पुण्यातील Army Paralympic Node यांना जाहीर करण्यात आला आहे.एकूणच, 2025 च्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांमध्ये विविध खेळांतील 17 खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। बुधवार ।
दि. 19 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## CASE STUDY: पिंपरी-चिंचवडमध्ये एका दिवसात १ हजार ४०५ टन कचरा!

# मोशी कचरा डेपो यंत्रणेवर प्रचंड ताण!

### दिवसभरात ३१६ वाहनांच्या फेऱ्या : महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधींनी आत्मचिंतन करण्याची गरज!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातून रोज निघणाऱ्या कचऱ्याचे आकडे थक्क करणारे आहेत. मोशी कचरा डेपोच्या वजनकाट्यावरील अधिकृत नोंदींनुसार, केवळ एका दिवसात (दि.१६ ऑगस्ट २०२६) शहरातील विविध ३२ प्रभागांमधून तब्बल १ हजार ४०५.०६ टन कचरा जमा झाला असून, त्यासाठी ३१६ वाहनांच्या फेऱ्या डेपोपर्यंत झाल्या. सरासरी काढल्यास, दर पाच मिनिटांनी एक कचरा वाहन डेपोत दाखल होत होते.**



मोशी कचरा डेपोवर दि. ८ जुलै २०२६ रोजी अतिवृष्टीमुळे कचऱ्याचा डोंगर कोसळला आणि भीषण दुर्घटना घडली. यामध्ये ९ निष्पाप कामगारांचा मृत्यू झाला. वेस्ट टू एनजी प्रकल्प सुरू होण्यासाठी आणखी महिनाभराचा कालावधी लागणार आहे. गेल्या महिन्याभरात सरासरी १ हजार ४०० टन कचरा संकलन झाले असेल, तर कचरा डेपोवर ५६ हजार टन कचऱ्याचा डोंगर महिनाभरात वाढला आहे. ही अत्यंत भीषण परिस्थिती आहे.

सुमारे ४० लाख लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराची ओळख कचरा कुंडीमुक्त अशी होती. आजची परिस्थिती पाहिली तर चौकाचौकात कचरा साचला आहे. शहराचा अक्षरश: उकीरडा झालेला आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी प्रशासन म्हणून आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी शहराचे 'पालक' म्हणून आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.

विशेष म्हणजे, अनेक मोठी कॉम्पॅक्टर वाहने एकाचवेळी दोन ते तीन शेजारील प्रभागांमधून कचरा उचलून येतात — जसे की प्रभाग १, ११ आणि १२ या तिन्ही भागांतून मिळून एकाच फेरीत तब्बल ११७ टनांहून अधिक कचरा एकत्रितपणे डेपोवर आणला गेला, असे नोंद आहे.

पहाटे ६.५० वाजल्यापासून सुरू झालेली वाहनांची ये-जा रात्री उशिरा २१.५३ वाजेपर्यंत सुरू होती. सकाळच्या वेळेत (७ ते ११) सर्वाधिक वाहनांची गर्दी नोंदवली गेली, जेव्हा घरगुती व व्यावसायिक आस्थापनांमधून कचरा उचलण्याचे काम पूर्ण वेगात सुरू असते. ही आकडेवारी शहराच्या वाढत्या नागरीकरणाचे आणि दैनंदिन कचरा व्यवस्थापनाच्या आव्हानाचे वास्तव चित्र दाखवते. प्रभाग २५, ३ आणि २७ सारख्या दाट लोकवस्तीच्या व व्यावसायिक भागांत कचरा संकलनाची तीव्रता अधिक असल्याने, तेथे स्वच्छता यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित होते.

### एजन्सीनिहाय कामगिरी

डेपोवर काम करणाऱ्या दोन्ही यंत्रणा — AG ENVIRO आणि BVG — यांनी दिवसभर अविरत फेऱ्या मारल्या. काही कॉम्पॅक्टर वाहनांनी तर एकेका फेरीत ३० टनांहून अधिक वजन वाहून नेल्याच्या नोंदी आहेत, जे शहरातील घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेवरील ताण स्पष्टपणे अधोरेखित करतात.

### सर्वाधिक कचरा कुठून?

आकडेवारीचे विश्लेषण केले असता, वाकड- ताथवडे-पुनावळे प्रभाग २५ मधून सर्वाधिक — सुमारे १३७ टन — कचरा गोळा झाल्याचे समोर आले, त्याखालोखाल मोशी-चऱ्होली प्रभाग ३ (१२२.५८ टन) आणि प्रभाग २७ (जवळपास १२० टन) यांचा क्रमांक लागतो. याउलट, प्रभाग ५ आणि ३१ मधून दिवसभरात अवघी एकेक फेरीच झाली, जिथून सर्वात कमी कचरा जमा झाला.

### प्रभाग क्रमांक १ ते ३२ - दि. १६/०८/२०२६ रोजीची एकत्रित कचरा संकलन आकडेवारी

| क्र. | प्रभाग/ प्रभाग गट | फेऱ्या | कचरा (टन) |
|---|---|---|---|
| १ | १ | ८ | १६.०३ |
| २ | २ | २० | ८५.७८ |
| ३ | ३ | ३१ | १२२.५८ |
| ४ | ४ | २ | ३.१७ |
| ५ | ५ | १ | १.७३ |
| ६ | ६ | ११ | ३१.८६ |
| ७ | ७ | २ | १५.५५ |
| ८ | ८ | २९ | ७५.८५ |
| ९ | ९ | ११ | ४०.२२ |
| १० | १० | ८ | २८.०१ |
| ११ | ११ | ९ | २३.३५ |
| १२ | १२ | १३ | २७.८४ |
| १३ | १३ | ५ | ७.१४ |
| १४ | १४ | १० | २८.८८ |
| १५ | १५ | ७ | २१.८५ |
| १६ | १६ | १० | ४७.४७ |
| १७ | १७ | ७ | २०.२१ |
| १८ | १८ | ३ | २०.७६ |
| १९ | १९ | ११ | ३६.६५ |
| २० | २० | १३ | ५२.०० |
| २१ | २१ | ८ | ३२.११ |
| २२ | २२ | १ | ८.४० |
| २३ | २३ | ५ | १९.३२ |
| २४ | २४ | ६ | ३५.१३ |
| २५ | २५ | १७ | १३७.२१ |
| २६ | २६ | ११ | ५९.३० |
| २७ | २७ | १२ | ११९.९० |
| २८ | २८ | ३ | २९.४२ |
| २९ | २९ | ३ | ७.२९ |
| ३० | ३० | ६ | १५.९२ |
| ३१ | ३१ | १ | ४.९१ |
| ३२ | ३२ | ५ | ९.८२ |
| ३३ | १४, १५ (संयुक्त) | ४ | २७.२६ |
| ३४ | ४, ५ (संयुक्त) | १ | ६. ६५ |
| ३५ | ३, ४, ५ (संयुक्त) | २ | २०.०७ |
| ३६ | २३, २४ (संयुक्त) | २ | ६. ८२ |
| ३७ | २५, २६ (संयुक्त) | १ | १०.४७ |
| ३८ | १, ११, १२ (संयुक्त) | १४ | ११७.५५ |
| ३९ | १७, १८ (संयुक्त) | १ | १. २६ |
| ४० | ३०, ३१, ३२ (संयुक्त) | २ | २९.४२ |

# महापौरांच्या हस्ते रिक्षा फिडर सेवेचा शुभारंभ

## विविध भागातील नागरिकांना मिळणार "घरापासून मेट्रोपर्यत "आणि "मेट्रोपासून घरापर्यंत"

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम,किफायतशीर आणि नागरिकांसाठी सोयीची करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम आहे. मेट्रो आणि रिक्षा सेवा एकमेकांना जोडल्यामुळे नागरिकांचा वेळ वाचणार तर आहेच याशिवाय पार्कींगची समस्या देखील कमी होऊन मेट्रोचा वापर वाढणार आहे. प्रवाशांना सन्मानपूर्वक आणि विश्वासार्ह सेवा मिळणे हीच या उपक्रमाची खरी ओळख ठरणार असून,रिक्षा चालकांनी प्रवाशांचे भाडे नाकारू नये, मीटरप्रमाणे सेवा द्यावी आणि शेअरिंग पद्धतीचा स्वीकार करावा असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.**

पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महामेट्रो आणि महाराष्ट्र रिक्षा पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने रिक्षा फिडर सेवेचा शुभारंभ महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्य शतृघ्न काटे, तुषार हिंगे, शहर अभियंता मनोज सेठीया,महामेट्रोचे व्यवस्थापक कॅप्टन सनेर पाटील, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह कार्यक्रमाचे संयोजक शुभम तांदळे, विजय ढगारे, विशाल ससाने, धनंजय कुदळे, दीपक ताटे, सुरज सोनवणे, दत्ता गिल्ले, भाऊसाहेब शेलार,रिक्षा चालक आणि विविध प्रवासी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या रिक्षा फिडर सेवेमुळे मेट्रो स्थानकावरून शहरातील विविध भागांमध्ये जाणाऱ्या प्रवाशांना शेअरिंग पद्धतीने रिक्षा सेवा उपलब्ध होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात विविध मार्गांवर सुमारे २० मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. या मार्गांची, रिक्षा थांब्यांची आणि भाड्याची माहिती देणारे दिशादर्शक फलक मेट्रो स्थानकांवर लावण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना कोणत्या गेटवरून कोणत्या भागासाठी रिक्षा उपलब्ध आहे, याची माहिती सहज मिळणार आहे.



रिक्षा चालकांसाठी महत्त्वाची नियमावली प्रवाशांना उत्तम सेवा देण्यासाठी मेट्रो स्टेशनवर उपस्थित सर्व रिक्षा चालकांनी प्रवाशांना कोणतेही भाडे नाकारू नये (No Refusal Policy) अन्यथा नियमांचे उल्लंघन करून प्रवाशांना सेवा नाकारणाऱ्या चालकांवर कायदेशीर आणि रिक्शा संघटनेच्या वतीने कारवाई करण्यात येईल असे महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे संस्थापक, अध्यक्ष बाबा कांबळे यांनी नमूद केले, या उपक्रमाद्वारे प्रवाशांचा वेळ तर वाचणारच असून, रिक्षाचालकांना हक्काचा आणि सन्मानजनक रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. स्मार्ट व नागरिककेंद्रित पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी या उपक्रमास महानगरपालिकेची पूर्ण साथ राहणार आहे.

या सेवेतील महत्त्वाचा निर्णय म्हणजे मेट्रो स्थानकावरून एखाद्या प्रवाशाने मीटरने जाण्याची मागणी केल्यास रिक्षा चालकाने मीटरप्रमाणे सेवा देणे आवश्यक आहे. तसेच प्रवाशाने इच्छित स्थळी जाण्याची मागणी केल्यास त्याचे भाडे नाकारू नये, अशा सूचना रिक्षा चालकांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मेट्रोमधून उतरलेल्या प्रवाशांना पुढील प्रवासासाठी रिक्षा सहज उपलब्ध होणार असून सार्वजनिक वाहतुकीवरील त्यांचा विश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

रिक्षा चालक हा शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो स्थानकापासून नागरिकांना त्यांच्या घरापर्यंत किंवा इच्छित स्थळी पोहोचविण्यात रिक्षा चालकांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्येक प्रवाशाला चांगली सेवा देऊन त्याच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा सुलभ करण्याचे काम रिक्षा चालकांनी करावे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास शहरातील इतर मेट्रो स्थानकांवरही अशा प्रकारची सेवा आणि रिक्षा थांबे सुरू करण्यासाठी महापालिका प्रयत्न करेल,तसेच रिक्शा स्थानकांवर ई चार्जीगची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे असेमहापौर रवि लांडगे म्हणाले,

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी "मेट्रो सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी मेट्रो स्थानकापासून पुढील प्रवासाची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक असून मेट्रोमधून उतरल्यानंतर प्रवाशाला सहज रिक्षा मिळाली आणि त्याला इच्छित स्थळी जाता आले, तर मेट्रो आणि रिक्षा या दोन्ही सेवांवरील नागरिकांचा विश्वास वाढेल. रिक्षा चालकांनी भाडे नाकारू नये, मीटरप्रमाणे किंवा निश्चित दराने सेवा द्यावी आणि शेअरिंग पद्धतीचा स्वीकार करावा. यामुळे प्रवासी आणि रिक्षा चालक दोघांनाही फायदा होईल असे सांगितले.

### सेवेचे स्वरूप व मार्ग

- गेट क्र. १: घरकुल प्रकल्प, जाधववाडी, कुदळवाडी, चिखली गाव, अजमेरा कॉलनी, केएसबी चौक, मोरवाडी कोर्ट, शाहुनगर.
- गेट क्र. २: अंथिया सोसायटी, अजमेरा कॉलनी, मासुळकर कॉलनी, अंतरिक्ष कॉलनी, खराळवाडी, मोनिका अपार्टमेंट, डी. वाय. पाटील कॉलेज.
- गेट क्र. ३: पिंपरी गाव, चिंचवडगाव, तापकीर नगर, वाल्हेकर वाडी, निगडी, डीलक्स चौक, काळेवाडी ब्रिज, साई चौक, चाफेकर चौक.

# श्री म्हाळसाकांत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

**महाईन्यूज I पिंपरी- चिंचवड**

**श्री म्हाळसाकांत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सेक्टर क्रमांक २८, प्राधिकरण, आकुर्डी, पुणे – ४११०४४ येथे दिनांक २७ जुलै २०२६ रोजी इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**



मा. उपप्राचार्य श्री. शशिकांत सात्रस सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. क्विक हील फाउंडेशन यांच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. "सुरक्षित डिजिटल भारत, सजग डिजिटल नागरिक" तसेच "माझा डेटा, माझी जबाबदारी" हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, सुरक्षित इंटरनेट वापराच्या सवयी विकसित करणे आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ज्ञान देणे, हे या अभियानाचे प्रमुख ध्येय आहे.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना सायबर फसवणूक, फिशिंग, बनावट संकेतस्थळे व दुवे, ओटीपी फसवणूक, सामाजिक माध्यमांची सुरक्षितता, ऑनलाइन गेमिंगमधील धोके, डिजिटल ठसे, मजबूत संकेतशब्द तयार करण्याच्या पद्धती तसेच वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विषय विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजावा यासाठी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, दैनंदिन जीवनातील उदाहरणे आणि संवादात्मक प्रश्नोत्तरांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबत अधिक माहिती जाणून घेतली.

ही कार्यशाळा एमआयटी एसीएससी, आळंदी महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर टीमने, विभागप्रमुख मा. श्री. अमित तळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा मा. सौ. अनुपमा काटकर मॅडम तसेच सहयोगी संचालक मा. श्री. अजय शिर्के सर यांच्या प्रेरणेतून राबविण्यात येणाऱ्या या अभियानाद्वारे देशभरातील विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होऊन सुरक्षित, सजग आणि जबाबदार डिजिटल समाज घडविण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पिंपळे निलखमध्ये स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष

## नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांच्या हस्ते सोसायट्या व शाळांमध्ये ध्वजारोहण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन वाकड आणि पिंपळे निलख परिसरात मोठ्या उत्साहात, देशभक्तीमय वातावरणात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. परिसरातील विविध सोसायट्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी नगरसेविका सौ. स्नेहा रणजित कलाटे यांच्या हस्ते विविध ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले.**



वाकड येथील आईस लँड सोसायटी, मालपाणी ग्रीन सोसायटी आणि ग्रीन व्हॅली सोसायटी येथे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहून सौ. स्नेहा रणजित कलाटे यांच्या हस्ते तिरंगा फडकविण्यात आला. यावेळी सोसायटी कमिटीचे पदाधिकारी, सभासद तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोसायट्यांच्या वतीने सौ. स्नेहा कलाटे यांचा सत्कारही करण्यात आला.



याचबरोबर कै. मारुती गेणू कस्पटे प्राथमिक शाळा, वाकड, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मुले-मुली शाळा, पिंपळे निलख आणि श्री साई इंग्लिश स्कूल, कावेरी नगर, वाकड येथेही उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, कर्मचारी आणि नागरिकांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य दिनाचा आनंद साजरा केला.

### ‘विकसित भारत २०४७’चा संकल्प’

‘विकसित भारत २०४७’चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका जबाबदारीने पार पाडण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सक्षम, आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी सकारात्मक योगदान द्यावे, असा संदेशही देण्यात आला. दरम्यान, स्वातंत्र्य दिनानिमित्त वाकड आणि पिंपळे निलख परिसरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. ‘जय हिंद’, ‘वंदे मातरम्’ आणि ‘भारत माता की जय’च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. तिरंग्याच्या साक्षीने नागरिकांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प केला.

### विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश

यावेळी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देताना स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्यागाचे स्मरण करण्यात आले. राष्ट्राची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, असे आवाहन करण्यात आले. देशाची भावी पिढी असलेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि देशसेवेची भावना आत्मसात करून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा नगरसेविका सौ. स्नेहा रणजित कलाटे यांनी व्यक्त केली.

# आदर्श शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**डिजिटल माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांना ऑनलाइन जगातील धोके समजावून देऊन त्यांना सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनविण्याच्या उद्देशाने आदर्श शिक्षण संस्था येथे इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.**



क्विक हील फाउंडेशन यांच्या ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ या अभियानांतर्गत आयोजित या सत्राचा मुख्य संदेश ‘माझा डेटा, माझी जबाबदारी’ हा होता. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेच्या मूलभूत बाबी समजावून देणे आणि इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदार वापर करण्याच्या सवयी विकसित करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

सत्रामध्ये विद्यार्थ्यांना वैयक्तिक माहितीची सुरक्षितता, मजबूत संकेतशब्द, ओटीपीची सुरक्षितता, फिशिंग व बनावट लिंक, समाजमाध्यमांची सुरक्षितता, सायबर बुलिंग, सुरक्षित ऑनलाइन गेमिंग, सुरक्षित इंटरनेट ब्राउझिंग, अनोळखी ॲप्स व फाईल्स डाउनलोड करण्याचे धोके याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

ऑनलाइन वापरताना कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास ती लपवून न ठेवता पालक किंवा शिक्षकांना त्वरित सांगणे किती महत्त्वाचे आहे, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

या उपक्रमासाठी मा. सौ. वंदना लढे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा मा. सौ. अनुपमा काटकर मॅडम यांच्या प्रेरणेतून आणि एमआयटी एसीएससी, आळंदीचे प्राध्यापक समन्वयक (फॅकल्टी कोऑर्डिनेटर) मा. श्री. अमित तळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. एमआयटी एसीएससी, आळंदी यांच्या सहकार्याने विविध शाळांमधील विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्याचे कार्य सुरू आहे.

सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सुरक्षित इंटरनेट वापरण्याचा तसेच कोणतीही संशयास्पद ऑनलाइन घटना घडल्यास पालक किंवा शिक्षकांची मदत घेण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होऊन सुरक्षित, सजग आणि जबाबदार डिजिटल पिढी घडविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

# महापालिकेत डेंग्यू-मलेरिया प्रतिबंध तपासणी

## कूलर, कुंड्या, पाण्याच्या टाक्यांसह पाणी साचणाऱ्या ठिकाणांची पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पावसाळ्यात डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या वतीने महापालिका मुख्यालय परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या वेळी मुख्य इमारतीसह महापालिका आवारातील कूलर, शोभेच्या झाडांच्या कुंड्या, पाण्याच्या टाक्या तसेच पाणी साचण्याची शक्यता असलेल्या विविध ठिकाणांची पाहणी करण्यात आली.**




महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

डेंग्यू मलेरिया प्रतिबंधासाठी आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा डासांची उत्पत्तीस्थळे वेळीच नष्ट करणे अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे महापालिका मुख्यालयासह सर्व शासकीय व सार्वजनिक आस्थापनांच्या परिसरात डासांची उत्पत्तीस्थळे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. तसेच नागरिकांनी घर, कार्यालय आणि परिसरात पाणी साचू न देण्याबरोबरच कूलर, कुंड्या, पाण्याच्या टाक्या आदींची नियमित स्वच्छता करावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

तपासणीदरम्यान कूलरमधील पाणी, कुंड्यांखालील ट्रे, पाण्याच्या टाक्या, वापरात नसलेली भांडी, शोभेच्या झाडांच्या कुंड्या, कार्यालयीन परिसर, वाहनतळ तसेच अन्य ठिकाणी पाणी साचले आहे का, याची पाहणी करण्यात आली. ज्या ठिकाणी पाणी साचलेले आढळून आले, तेथील पाणी तत्काळ काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या. परिसरात स्वच्छता राखण्यासह भविष्यात पाणी साचणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना करण्यात आल्या तसेच, महापालिकेकडून डेंग्यू मलेरिया तपासणी मोहिम वेळोवेळी राबविण्यात येणार आहे.

आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या पथकांनी महापालिका मुख्यालयातील विविध विभाग, कार्यालयीन परिसर, वाहनतळ आणि आजूबाजूच्या परिसराची पाहणी केली. डासांची उत्पत्तीस्थळे नष्ट करण्याबरोबरच अधिकारी व कर्मचाऱ्यांना डेंग्यू मलेरिया प्रतिबंधासाठी आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहिल्यास डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरासह कार्यालय व परिसराची नियमित पाहणी करून पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. डासांची उत्पत्तीस्थळे वेळीच नष्ट करून डेंग्यू मलेरियाचा प्रसार रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या वेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. संध्या भोईर, वैद्यकीय अधिकारी (एनयूएचएम) डॉ. विजया आंबेडकर, सहा.आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, प्रशासन अधिकारी संतोष कोराड, साथरोग अधिकारी डॉ. आनंदऋषी परिमल्ला, मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे, कांचनकुमार इंदलकर, स्नेहा चांदणे, राहुल जेटीथोर, सिटी प्रोग्राम मॅनेजर चैताली इंगळे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# यश मिळाल्यानंतर संस्कार, विवेक आणि नम्रता जपावी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**फळांनी बहरलेले वृक्ष जसे नम्रतेने झुकतात, त्याप्रमाणे ज्ञान व कर्तृत्व प्राप्त झाल्यानंतरही व्यक्तीने नम्र राहिले पाहिजे. यश मिळाल्यानंतर संस्कार, विवेक आणि नम्रता जपावी असे मार्गदर्शन डीआरडीओ चे शास्त्रज्ञ के. व्ही. कोकिळ यांनी केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये शनिवारी, स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कोकिळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना जोपासत विज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्याधिष्ठित शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे असे प्राचार्य डॉ. बिंदू सैनी सांगितले.

यावेळी उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, सुलोचना पवार, दीपक बल्लाल, क्रांती कुलकर्णी, श्रुती दिवटे, धनाजी पाटील, चंद्रकांत ठिंबरे, रमेश नंदाला, अंकित तांबे, श्रीकांत देशपांडे, प्रिया सूर्यवंशी, गौरी उत्तुरे, अजय चावरिया, सुजाता भोईटे, क्रांती कुलकर्णी, ट्रीझा पीटर्स, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते.

विद्यार्थी रुद्रांश भोंडवे, विदिशा ठाकूर, समृद्धी नायक स्वातंत्र्यदिनाचे महत्व सांगितले. साक्षरता व व्यसनमुक्त भारत सामूहिक प्रतिज्ञा घेतली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्ती गीत सादर केले. नवसाक्षरता अभियानांतर्गत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या निर्मला कांबळे, सुनीता घाडगे, अनिता साबणे आणि स्मिता खुराडे यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. सूत्र संचालन जुई भोंडवे, पार्थ कुलकर्णी, अनुष्का पाधियार, तनिष्का नेहरे, यांनी केले. स्वर्णिमा कुलकर्णी हिने आभार मानले.

# हाफकिनला गतवैभव मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायतराज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तसेच अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी आज पिंपरी येथील हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळास भेट देऊन उत्पादन विभाग, सर्पालय, अश्व संवर्धन विभाग तसेच अत्याधुनिक प्रयोगशाळेची पाहणी केली. यावेळी त्यांनी संस्थेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

हाफकिन संस्थेची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करावा, अँटी-स्नेक व्हेनम सीरमचे उत्पादन वाढवावे तसेच राज्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंश उपचार किट उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले. हाफकिनच्या प्रलंबित निधीबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून, यासाठी केंद्र शासनाकडेही पाठपुरावा करण्यात येईल. संस्थेच्या प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी पुढील आठवड्यात मंत्रालयात विशेष बैठक घेण्यात येईल, अशी माहिती राज्यमंत्री कदम यांनी यावेळी दिली. हाफकिन संस्थेकडे असलेली क्षमता, प्रदीर्घ अनुभव आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा यांचा प्रभावी वापर करून संस्थेला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त हुकरे, हाफकिनचे महाव्यवस्थापक धीवर, डॉ. बाबासाहेब कुरहे यांच्यासह महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**DTE Code 6310**

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

Approved by AICTE · Accredited by NAAC · Accredited by NBA

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |

Highest Package for PCET-Nutan **61 Lakh P.A.**

Average Salary Package **5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:

**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507